महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ४२ वा | दिनांक : ०१/११/२०२४ | वार : शुक्रवार

## अब्दुल सत्तार यांचा उमेदवारी रद्द करण्याची मागणी



**सिल्लोड :** विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार अब्दुल सत्तार यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात गंभीर प्रकारच्या सोळा चुका असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. तसेच सत्तार यांच्या शपथपत्रात मालमत्तांची, वाहनांची, हिऱ्यांच्या दागिण्यांची खोटी माहिती दिल्याचा आरोप देखील सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपल्ली आणि डॉ. अभिषेक हरिदास यांनी केली आहे.

या संदर्भात आपण निवडणूक आयोगाकडे तक्रार देखील दाखल केली असल्याचे शंकरपल्ली यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सत्तार यांनी शपथपत्रात दाखवलेल्या मालमत्तेचा तपशील आणि प्रत्यक्ष मालमत्ता यामध्ये प्रचंड तफावत आहे. अनेक मालमत्तांचे क्षेत्रफळ हे चुकीचे दाखवण्यात आले आहे. तसेच मालमत्तेवर करण्यात आलेल्या बांधकामाच्या गुंतवणुकीची माहिती देखील दाखवण्यात आली नसल्याचे या आरोपात म्हटले आहे. काही मालमत्ताची माहिती शपथ पत्रातून गायब करण्यात आली आहे. विविध सहकारी संस्थांमध्ये सत्तार त्यांच्याकडे असलेल्या शेअर्सबाबतही खोटी माहिती देण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

२०१९ विधानसभा निवडणुकीतही सत्तार यांनी शपथपत्रात अनेक गोष्टी लपवून निवडणूक आयोगाची फसवणूक केली होती. यासंदर्भात देखील सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका दाखल करण्यात आली होती. त्या प्रकरणात देखील न्यायालयाने सातार्‍यांना समन्स बजावले होते. मात्र हे प्रकरण अद्याप सुनावणीसाठी प्रलंबित आहे. असे असताना सत्तारी यांनी पुन्हा एकदा खोटे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे सत्तार यांची उमेदवारी रद्द करण्यात यावी अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

शासनाची दिशाभूल करून शिष्यवृत्ती मिळविलेल्या शाळांच्या यादीमध्ये कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्या शाळांची नावे समाविष्ट आहेत, असा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते महेश शंकरपल्ली यांनी दोन वर्षांपूर्वी केला होता. त्यामुळे कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या शैक्षणिक संस्थांची उच्चस्तरिय चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास अब्दुल सत्तार यांच्या शैक्षणिक संस्थांची मान्यता रद्द करावी, अशी मागणी आरटीआय कार्यकर्ते महेश शंकरपल्ली यांनी केला होती. महेश शंकरपल्ली यांनी गैरमार्गाने शिष्यवृत्ती मिळवलेल्या शाळांची यादीही जाहिर केली होती. या यादीतील अनेक शाळा या कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्या असल्याचा आरोप त्यांनी केला होता. भ्रष्ट मंत्र्याने केवळ पैसा कमावण्यासाठी शाळा सुरू केल्या आहेत. यातून शिक्षणाचा बाजार मांडला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरिय चौकशी करावी व घोटाळा सिद्ध झाल्यास शैक्षणिक संस्थांची मान्यता रद्द करावी, अशी मागणी महेश शंकरपल्ली यांनी केली होती.

## भाजपने माझे घर फोडले, पत्नीला माझ्या विरोधात उभे केले : हर्षवर्धन जाधव





**छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणुकी आता अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांमध्ये व उमेदवारांमध्ये आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. कन्नड विधानसभा मतदारसंघात हर्षवर्धन जाधव अपक्ष लढणार असून त्यांच्या विरोधात त्यांच्या पत्नी संजना जाधव निवडणूक लढणार आहेत. बायकोलाच आपल्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरवल्याने हर्षवर्धन जाधव यांनी संताप व्यक्त केला आहे.

हर्षवर्धन छत्रपती संभाजीनगर येथे बोलताना म्हणाले, आमच्या कुटुंबातील एका सदस्याला फोडून एका राजकीय पक्षाने तिकीट दिले. कुठेतरी या सगळ्या गोंधळाच्या पाठीमागे रावसाहेब दानवे आहेत. माझे घर फोडले आणि आता माझ्या विरोधात साक्षात माझी पत्नी उभी करण्याचे काम झाले, याचा मी जाहीर निषेध व्यक्त करतो, अशी टीका हर्षवर्धन जाधव यांनी रावसाहेब दानवे व भाजप पक्षावर केली आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन जाधव म्हणाले, दिवाळी दोन दिवसांवरती आलेली आहे. सर्वजण आपल्या कुटुंबासमवेत दिवाळी साजरी करत आहेत. माझ्याकडे दिवाळी साजरी करण्यासाठी कोणच उरले नाही. मी आणि माझी आई दोघेच उरलेलो आहोत. ठोकून काढू शेवटी धर्मयुद्ध आहे, असा इशारा देखील हर्षवर्धन जाधव यांनी दिला आहे.

माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी कन्नड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. तसेच भाजप पक्षाने त्यांची पत्नी संजना जाधव यांना याच मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. त्यामुळे कन्नड विधानसभा मतदारसंघात पती विरुद्ध पत्नी असा सामना रंगणार आहे.

याशिवाय कन्नड मतदारसंघात ठाकरेंच्या शिवसेनेचे उदयसिंह राजपूत विद्यमान आमदार आहेत. त्यांना उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा निवडणुकीच्या मैदानात उतरवले आहे.

## दाऊदशी संबंध असल्याचा आरोप करणाऱ्यांना कोर्टात खेचणार : नवाब मलिक



**मुंबई :** माझ्यावर दाऊदशी संबंध असल्याचा आरोप करणाऱ्यांना नोटीस पाठवणार, असे नवाब मलिक यांनी म्हटले आहे. माझ्यावर अशा प्रकारच्या आरोपाचा कोणताही खटला दाखल नाही. माझ्यावर दाऊदशी संबंध असल्याचा किंवा त्यासंबंधीत आरोप करणाऱ्यांवर मी न्यायिक कारवाई करणार आहे. त्यांच्याविरोधात मी न्यायालयात धाव घेणार असून त्यांच्यावर बदनामीचा खटला टाकणार आहे. कितीही मोठा नेता असला, तरी नोटीस पाठवेन, असा इशारा नवाब मलिक यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला आहे.

समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांचे निवडणुकीत आव्हान राहिल का? या प्रश्नावर उत्तर देतात मलिक म्हणाले की, निवडणूक हे आव्हानच असते, पण शिवाजी नगर मानखुर्द मधून निवडणूक लढवण्याचा निर्णय लोकांच्या आग्रहास्तव घेतला आहे. आज या मतदारसंघात महिला तक्रार घेऊन गेल्यास तिचे कपडे फाडले जातात, त्यांचे नगरसेवक काठ्या घेऊन लोकांना धमकावतात, ड्रग्सचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अशाप्रकारची गुंडशाही सुरू आहे. ही गुंडशाही संपवण्यासाठी, ड्रग्समुक्त शिवाजीनगरसाठी मी निवडणूक लढत आहे आणि मी ही निवडणूक जिंकणार, असा दावा नवाब मलिक यांनी केला.

समाजवादी पक्षाच्या कार्यालयात काही मुले ड्रग्सचे सेवन करत असल्याचा व्हिडिओ समोर आला होता. त्यावर बोलताना नवाब मलिक यांनी शिवाजीनगरमधील लोकांना स्वत:च्या मुलांना सांभाळा, त्यांना समाजवादी पक्षापासून दूर राहण्यास सांगा, असे आवाहन केले. समाजवादी पक्षाचे कार्यालय ड्रग्सचा अड्डा झालेले आहे. त्यांच्या लोकांचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. याबाबत मी लोकांना सोशल मीडियाच्या माध्यमातून सावध करणार आहे, असेही मलिक म्हणाले.

भाजपच्या नवाब मलिकांचा प्रचार करणार नाही, या भूमिकेवरही त्यांनी भाष्य केले. त्यांनी माझा प्रचार नाही केला तरी काही हरकत नाही. माझ्या प्रचाराला या, असा मी आग्रह देखील धरत नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार असून जनतेच्या पाठबळावर निवडणूक लढत आहे. पण दाऊदशी नाव जोडणाऱ्यांवर मी कायदेशीर कारवाई करणार, असा पुनरुच्चार मलिकांनी केला. मी उमेदवारी मागे घेणार नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेसचा अधिकृत उमेदवार नात्याने निवडणूक लढत आहे, असेही ते म्हणाले.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ नोव्हेंबर २०२४


## धनंजय मुंढेकडून शपथपत्रात ५ अपत्यांचा उल्लेख



**परळी :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने परळीतून धनंजय मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. धनंजय मुंडे आपला उमेदवारी नामांकन देखील दाखल केले. नामांकन दाखल करताना सादर केलेल्या शपथपत्रात त्यांना पाच अपत्य असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. विशेष म्हणजे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात तीन अपत्य असल्याची पुष्टी केली होती. मात्र, यंदाच्या विधानसभा निवडणुकीवेळी सादर केलेल्या शपथपत्रात पाच अपत्य असल्याचा उल्लेख केला आहे.

धनंजय मुंडे यांनी २०१९ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना सादर केलेल्या शपथपत्रात तीन अपत्य असल्याची माहिती दिली होती. यंदाच्या निवडणुकीवेळी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात शिवानी मुंडे आणि सिशिव मुंडे या दोन अपत्यांचा समावेश केला आहे. शिवानी आणि सिशिव आधी धनंजय मुंडे यांच्यावर अवलंबून नव्हते, असे या शपथपत्रावरुन दिसून येते.

प्रतिज्ञापत्रामध्ये प्रतिज्ञापत्र देणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख केला जातो. सध्या शिवानी आणि सिशिव हे दोघेही धनंजय मुंडे यांच्यावर अवलंबून आहेत, त्यामुळे त्यांचा शपथपत्रात उल्लेख करण्यात आल्याचे समजते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी धनंजय मुंडेंनी दिलेल्या शपथपत्रात वैष्णवी मुंडे, आदीश्री मुंडे आणि जानवी मुंडे या तीन अपत्यांचा उल्लेख केला होता.

धनंजय मुंडे यांच्या संपत्तीत पाच वर्षांत जवळपास दुप्पट वाढ झाली आहे. त्यांच्याकडे २०१९ मध्ये २३ कोटींची संपत्ती होती. तर २०२४ मध्ये सादर करण्यात आलेल्या शपथपत्रात ५३.८० कोटींची संपत्ती नमूद केली आहे. धनंजय मुंडे त्यांची पत्नी आणि कुटुंबाकडे ५३ कोटी ८० लाखांची संपत्ती आहे. धनंजय मुंडे यांच्याकडे १५ कोटींची वाहने, दीड किलो चांदी आहे. तर त्यांच्या नावे १५ कोटी ५५ लाख ५ हजार १०५ रुपयांचे विविध वाहने आहेत. त्यात टँकरपासून ते बुलेटपर्यंतच्या सात वाहनांचा समावेश आहे. सात लाख तीन हजार रुपयांचे १९० ग्रॅम सोने आहे.

२०१९ विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी भाजपच्या पंकजा मुंडे यांचा पराभव केला होता. त्यावेळी धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. मात्र अजित पवारांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आणि धनंजय मुंडे अजित पवार गटात गेले. त्यामुळे शरद पवार यांनी परळीची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. शरद पवार यांनी धनंजय मुंडेविरोधात राजसाहेब देशमुख यांना रिंगणात उतरवले आहे.

## अपक्ष असले तरी समीर भुजबळच जिंकणार छगन भुजबळ यांचा दावा



**नाशिक :** नांदगाव विधानसभा मतदारसंघात छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ हे अपक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सुहास कांदे आणि अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांच्यात निवडणुकीच्या तोंडावर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

यावर मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. समीर भुजबळ जरी अपक्ष लढत असले तरी देखील आम्ही लक्ष्मीपूजनासाठी एकत्र येणार आहोत, असे भुजबळ म्हणाले. तसेच निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीसाठीच दिवाळी गोड असणार, असा विश्वास देखिल त्यांनी व्यक्त केला आहे.

छगन भुजबळ एका वृत्त वाहिनीला मुलाखत देताना म्हणाले, निवडणुकीत शिव्या आणि दादागिरी केली तरी कायदा आपले काम करेल. नांदगावमध्ये जे घडले ते समीर भुजबळ यांच्या फायद्याचे असणार आहे. समीर भुजबळ यांना उभे राहण्याआधी मी सांगितले होते की राष्ट्रवादीच्या सर्व पदांचा राजीनामा द्यावा लागेल. त्यांनी देखील हे मान्य करत अपक्ष उमेदवारी करण्याचा निर्णय घेतला.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, नांदगावची लोक दहशतवादाला खूप कंटाळली आहेत. भयमुक्त नांदगाव ही टॅगलाईन समीर भुजबळ यांनी त्यासाठीच दिले आहे. नांदगावमध्ये किती दहशत आहे हे ऑडिओ आणि व्हिडिओमुळे जगासमोर आले आहेत. सध्याचा नांदगावकरांचा कल समीर भाऊंच्या बाजूने झुकतो आहे. त्यामुळे त्यांचा विजय मला निश्चित वाटतो, असा विश्वास भुजबळ यांनी व्यक्त केला आहे.

दिवाळी सणावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, आता दिवाळीचा आनंद हा स्वतःपुरताच उरलेला आहे. लहानपणीच्या दिवाळीचा आनंद आता संपलेला आहे. सध्या फक्त दिवाळीची औपचारिकता बाकी आहे. दिवाळीत नवीन कपडे आणि काहीतरी नवीन करायचं पण आता तसे उरले नाही. निकाल लागत नाही तोपर्यंत सर्वांसाठी दिवाळी गोड आहे. निकालानंतर महायुतीसाठीच दिवाळी गोड असणार हे शंभर टक्के आहे, असे देखील छगन भुजबळ म्हणाले.

## सरकार शेतकऱ्यांच्या गळ्याभवतीचा फास आवळतंय - जयंत पाटील

**मुंबई :** सरकारने कापसाच्या २२ लाख गाठी विदेशातून आयात केल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळत असलेला भावही मिळणार नसल्याचे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकार पदोपदी शेतकऱ्यांच्या गळ्याभवतीचा फास आवळत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आपल्या सोशल मीडिया हँडलवरून प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, कपाशी हे शेतकऱ्यांसाठी पांढरं सोनं असतं या पांढऱ्या सोन्याला योग्य भाव नसल्याने शेतकऱ्यांचा कापूस पडून आहे. त्यात आता सरकारने कापसाच्या २२ लाख गाठी विदेशातून आयात केल्या आहेत. त्यामुळे आपल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळण्याची आशा धुसर झाली आहे. हे सरकार पदोपदी शेतकऱ्यांच्या गळ्याभवतीचा फास आवळत आहे.

जयंत पाटील म्हणाले की,, या सरकारने मागील २ वर्षात शेतकऱ्यांना फक्त भोपळा दिला आणि त्यामुळेच शेतकऱ्यांचे हित न जोपासणाऱ्या या सरकारला आपल्याला घालवायचे आहे.

जयंत पाटील म्हणाले की, अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी अजित पवार भाजपसोबत गेले. भाजपने अनेक नेत्यांवर आरोप केले ते भाजपसोबत गेले. हसन मुश्रीफ यांच्यावर भाजपने आरोप केले होते आता ते महायुतीमध्ये मंत्री आहेत. नवाब मलिक यांच्यावर भाजपने गंभीर आरोप केले होते पण ते आता अजित पवार गटाचे अधिकृत उमेदवार आहेत. भाजपचे जे मतदार आहेत ते सुद्धा गोंधळलेले आहेत. भाजपने स्वतःला वेगळा पक्ष म्हटलं होतं, पार्टी विथ डिफरन्स म्हटले होते पण आता त्यांचा पाठीराखा वर्गही संभ्रमात आहे.

## मनोज जरांगे पाटील यांनी मराठा - दलित - मुस्लिम एकत्र येण्याची केली घोषणा



**जालना :** विधानसभा निवडणुकीत उमेदवार द्यायचे की नाही, या संदर्भात चर्चा करण्यासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज बैठक बोलावली होते. त्यांच्या निर्णयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अजून काही समीकरणे जुळवण बाकी असल्याने त्यांनी हा निर्णय दिवाळीच्या पाडव्याला म्हणजेच २ नोव्हेंबरला जाहीर करणार असल्याचे सांगिले होते.

मात्र, याच पार्श्वभूमीवर त्यांनी मुस्लीम धर्मगुरु, दलित समाजाच्या ज्येष्ठ नेत्यांशी संवाद साधला. या बैठकीत मराठा-दलित-मुस्लिम एकत्र येण्यावर एकमत झाले असल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितले. त्यामुळे आता आम्ही एकत्र आलो असून सत्ता परिवर्तन होणार असल्याचा दावा जरांगे पाटील यांनी केले.

केवळ एकट्या मराठा समाजामुळे निवडणुकीत यश मिळणार नाही. त्यामुळे मुस्लिम व दलित समाजाशीही समीकरणे जुळवण्याचा जरांगे पाटील प्रयत्न करत आहेत. याच संदर्भात एक निर्णायक बैठक आज आंतरवाली सराटी येथे बोलावली होती. अन्यायाचे संकट आम्हाला परतून लावायचे असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. आम्हाला संपवायला निघालेल्याला आम्हाला संपवायचे आहे. मराठा समाजाने जे स्वप्न पाहण्यात आले होते, ते स्वप्न आज साकार होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बदल होत असतो मात्र, परिवर्तन होत नसते. आता आमचे समिकरण पक्के झाले असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

मराठा-दलित-मुस्लिम एकत्र आला यावर आमचे एकमत झाले आहे. मात्र, कोणत्या-जागा कोण लढणार? यावर ३ तारखेला निर्णय घेणार असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. आमचे उमेदवार कोण? हे ३ तारखेला जाहीर करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्या नंतर इतर उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घ्यायची असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. सर्व मतदारसंघात उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले आहेत. मात्र, आम्ही एकाला उमेदवार म्हणून घोषीत केल्यानंतर इतरांनी अर्ज मागे घेण्याचे आव्हान देखील त्यांनी केले आहे.

दलित-मराठा-मुस्लिम शहाणे होणे गरजेचे आहे. तरच आमचे उमेदवार निवडून येतील. कधी चेहरा न बघितलेली शेतकऱ्यांची मुले आमदार होतील. मुस्लिम समाजातील मुलांनाही आमदार, मंत्री होता येईल. हे सुंदर स्वप्न पूर्ण होण्यासाठी ही समीकरणे जुळायला हवी, त्यासाठी बैठक घेत असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

गेल्या आठवडाभरापासून जरांगे दररोज सातत्याने बैठका घेत आहेत. अनेक राजकीय नेते, इच्छूक उमेदवार त्यांना रात्री- बेरात्री, पहाटे भेटीसाठी येत आहेत. या अति बैठकांमुळे त्यांचे पाय सुजले आहेत. वेदनाही होत असल्याने उपचार सुरु आहेत. बुधवारी त्यांना सलाइनही लावले होते. 'दोन दिवस सर्वांशी चर्चा करत आहोत. त्यामुळे पाडव्यापर्यंत कुणीही आंतरवालीत येऊ नये' असे आवाहन त्यांनी केले आहे.

निवडणुकीसाठीसाठी माझ्या नावाने कुणी पैसे मागत असेल तर देऊ नका. मी पैशांवर पाठिंबा देतो असे सांगणाऱ्याचे नाव कळले तर मी त्या माणसाचा मुडदाच पाडणार. इथे पैशांचा विषय नाही तर समाजाचा विषय आहे, असे जरांगे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना जरांगे म्हणाले, 'ज्यांच्याशी ४० वर्षे जमले नाही अशा लोकांना सोबत घेऊन 'यांनी' सत्ता मिळवली. त्यांच्यासारखा विश्वासघातकी माणूस आज राजकारणात कुणीच नाही.'

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ नोव्हेंबर २०२४


## देवेंद्र फडणवीसांनी केला भाजपमधील बंडखोरी शमवण्याचा दावा



**मुंबई** : निवडणुकीतील बंडखोरांचे बंड शमवण्यासाठी पक्षांकडून प्रयत्न सुरू आहेत. महायुतीच्या काही मतदारसंघातही बंडखोरी झाली असून आम्ही त्यांच्याशी चर्चा करत आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवसापर्यंत महायुतीच्या जागांवर दाखल झालेले क्रॉस फॉर्म मागे घेतलेले असतील, असेही फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी राज ठाकरे यांनी व्यापक हिंदुत्वाची भूमिका घेतली, असेही म्हटले.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, नामांकनानंतर काही ठिकाण क्रॉसफॉर्म आले होते. त्यासंदर्भात काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरी आम्ही सर्वांची बैठक झाली. जवळपास सर्व अडचणी आम्ही संपवल्या आहेत. जे परत घेतले पाहिजे असे क्रॉसफॉर्म परत घेतले जातील. काही ठिकाणी एकमेकांच्या उमेदवारांसमोर क्रॉस बंडखोरी झाली आहे. त्यासंदर्भात निती तयार केली असून तिकीट नसताना उमेदवारी भरणाऱ्यांशी चर्चा करत आहोत. त्यांना माघार घ्यावी यासाठी तिन्ही पक्षांचा प्रयत्न आहे. काही ठिकाणी पक्षांतर्गत आमचे कार्यकर्ते उभे राहिले आहेत. त्यांना विश्वास घेऊन चर्चा करुन त्यांनी माघार घ्यावी, यासाठी आमचे प्रयत्न सुरू असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

गोपाळ शेट्टी भाजपचे प्रामाणिक कार्यकर्ता राहिलेले आहेत. ते अनेकवेळा आग्रही असतात, पण ते पक्षशिस्तही मान्य करतात. गोपाळ शेट्टी यांना सगळी परिस्थिती समजावून सांगू. तसेच त्यांनी नेहमीप्रमाणे भाजपच्या मागे राहण्याची भूमिका घ्यावी, यासाठी आमचा प्रयत्न असेल, असे फडणवीस म्हणाले.

मी राज ठाकरेंचा आभारी आहे. त्यांच्या शुभेच्छा नम्रपणे स्वीकारतो. पण महाराष्ट्रात भाजपचे सरकार येणार नसून महायुतीचे सरकार येणार आहे आणि महायुतीचाच मुख्यमंत्री असेल, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज ठाकरे भाजपाला उघडपणे पाठिंबा देत आहेत. त्यामुळे उत्तर भारतीयांचे मत भाजपापासून दूर जाईल का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, याबद्दल मी लोकसभेलाच बोललो आहे. राज ठाकरे यांनी व्यापक हिंदुत्वाची भूमिका घेतलेली आहे. क्षेत्रीय अस्मितेला भाजपचे नेहमीच समर्थन राहिले आहे. राष्ट्रीय अस्मितेचा स्वीकार होणे महत्त्वाचे असते. ती राष्ट्रीय अस्मिता म्हणजेच हिंदुत्व हे राज ठाकरेंनी स्वीकारले आहे, असे फडणवीस म्हणाले.

अमित ठाकरे यांना पाठिंबा देण्याबाबत आमची सगळी बोलणी सुरू आहे. राज ठाकरे, एकनाथ शिंदे, आशिष शेलार आमची चर्चा सुरू असून सगळे एकत्र राहून मार्ग निघाला पाहिजे, असा आमचा प्रयत्न सुरू असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## सुनेत्रा पवारांना उमेदवारी देणे वैचारिक दिवाळखोरी : विजय शिवतारे





**पुणे** : शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे पुरंदर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विजय शिवतारे यांनी लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देत मदत केली होती. मात्र, अजित पवारांनी विधानसभा निवडणुकीसाठी शिवतारे यांच्याविरोधात संभाजी झेंडे यांना उमेदवारी दिली आहे. यावर विजय शिवतारे यांनी प्रतिक्रिया देत सुनेत्रा पवारांना पाडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या झेंडे यांना उमेदवारी देणे ही वैचारिक दिवाळखोरी असून अशांना उमेदवारी देताना स्वाभीमान कुठे ठेवला होता, असा सवाल विजय शिवतारे यांनी उपस्थित केला.

शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे बारामतीतून लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. त्यावेळी त्यांनी बंड मागे घेत सुनेत्रा पवार यांना लोकसभा निवडणुकीत मदत केली होती. लोकसभेला मदत करुनही अजित पवारांनी पुरंदरमधून शिवतारेंविरोधात उमेदवार कसा दिला, असा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विजय शिवतारे यांनी अजित पवारांना लोकसभेवेळी दिलेल्या वचनाची आठवण करुन दिली.

मी बारामती लोकसभा मतदारसंघातून माघार घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरंदरचा किल्लेदार विधानसभामध्ये पाठवा, असा शब्द तिन्ही नेत्यांसमोर दिला होता. असे असूनही संभाजी झेंडे यांची उमेदवारी का जाहीर केली? निष्ठावान राष्ट्रवादीच्या नेत्याला संधी दिली असती, तरी मला चालले असते. पण सुनेत्रा पवारांना पाडण्यासाठी प्रयत्न करणाऱ्याला उमेदवारी देताना स्वाभिमान कुठे ठेवला? असा सवाल शिवतारे यांनी उपस्थित केला आहे.

लोकसभा निवडणुकीत बारामती लोकसभा मतदारसंघात ज्याने सुनेत्रा पवारांना पडण्याचा प्रयत्न केला त्यालाच अजितदादांनी तिकीट दिल्याबाबत मला आश्चर्य वाटते. संभाजी झेंडे यांनी सुनेत्रा पवारांना पाडण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली होती. त्यांनाच उमेदवारी देणे ही वैचारिक दिवाळखोरी आहे, असेही विजय शिवतारे म्हणाले.

## आर. आर. पाटलांनी केसाने गळा कापला वक्तव्यावर अजित पवार यांचे उत्तर



**मुंबई** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कथित सिंचन घोटाळ्याचे खापर राज्याचे दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्यावर फोटले होते. त्यानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळातून संतप्त सूर उमटत असताना अजित पवारांनी आता हा विषय आपल्यासाठी संपला असल्याचे स्पष्ट केले आहे. मी माझ्या सद्सद् विवेकबुद्धीला जे पटले ते बोललो, पण आता हा विषय माझ्यासाठी संपला आहे, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांची नुकतीच सांगली येथे एक सभा झाली होती. या सभेत बोलताना त्यांनी सिंचन घोटाळ्यात आर. आर. पाटील यांनी आपला केसाने गळा कापल्याचा गंभीर आरोप केला होता. माझ्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप झाला. त्याची खुली चौकशी करण्याच्या फाईलवर आर. आर. पाटील यांनी स्वाक्षरी केली होती. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर ही फाईल मला दाखवली. आबांनी माझा केसाने गळा कापण्याचा प्रयत्न केला होता, असे ते म्हणाले होते.

अजित पवार यांच्या या आरोपानंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली होती. याविषयी पत्रकारांनी गुरुवारी अजित पवार यांना छेडले असता त्यांनी माझ्या दृष्टिने हा विषय संपल्याचे नमूद करत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. जे काही व्हायचे होते ते झाले. आता मला ते पुन्हा उखरून काढायचे नाही. माझ्या सद्सद् विवेकबुद्धीला जे पटले तेच मी सांगितले. त्याचा व निवडणुकीचा कोणताही संबंध नाही. माझ्या दृष्टिने आता हा विषय संपला आहे, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, आर. आर. पाटील यांच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांचे सुपुत्र रोहित पाटील यांनी अजित पवारांवर सडेतोड प्रत्युत्तर दिले होते. आर. आर. पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत प्रामाणिकपणे व स्वच्छपणे काम केले. राज्याच्या गृहमंत्रीपदी असताना त्यांनी पारदर्शक भरती करून घेतली. अत्यंत सक्षमपणे त्यांनी गृहमंत्रीपद सांभाळले. आज आबांना जाऊन साडेनऊ वर्षे झाली. एवढ्या वर्षांनी त्यांच्यावर झालेले आरोप पाहून अतिशय दुःख झाले. अजित पवार ज्येष्ठ नेते आहेत. आम्ही त्यांच्या नेतृत्वात काम केले आहे. त्यांनी जे आरोप केले, ते कुटुंब म्हणून वाईट वाटते. आबा हयात असते तर त्यांनी त्याला प्रत्युत्तर दिले असते. पण आबांनी डान्स बार बंदीसारखे अनेक धाडसी निर्णय घेतले. त्यावेळी त्यांना मोठमोठ्या ऑफर असतानाही ते डान्सबार बंदीवर ठाम राहिले. महाराष्ट्रातील विचारांचे संरक्षण झाले पाहिजे हा विचार त्यांनी त्यावेळी मांडला. त्यामुळे अजित पवारांच्या वक्तव्याला आता जनताच उत्तर देईल, असे रोहित पाटील यांनी म्हटले होते.

## मोदी-शहांचे राजकारण महाराष्ट्राच्या हिताचे नाही — संजय राऊत

**मुंबई** : संजय राऊत ज्या पद्धतीचे कारण गेल्या काही काळांपासून फडणवीस व मोदी - शहा करत आहेत. ते महाराष्ट्राच्या हिताचे नाही, मराठी माणसाच्या हिताचे नाही, महाराष्ट्राच्या स्वाभिमान व अस्मितेचे नाही आणि तरीही मराठी माणसाच्या हितासाठी स्थापन झालेल्या एका पक्षाचे प्रमुख सांगत आहेत की, आम्ही फडणवीस यांना मुख्यमंत्री करू, मग हा कोणता दबाव आहे हे मला माहिती नाही.

हा दबाव ईडीचा आहे की सीबीआयचा आहे की आणखीन कशाचा आहे? ठिक आहे, राजकारणात प्रत्येक पक्षाला आपापली भूमिका घेण्याची मुभा आहे. तशी भूमिका त्यांनी घेतली असेल.

ते अनेक वर्षांपासून निवडणूक लढत आहेत. त्यात त्यांना काय फळ मिळत आहे हे ही आपण पाहत आहोत. येऊद्या त्यांचे सरकार, असे संजय राऊत यावेळी म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०१ नोव्हेंबर २०२४


## रवी राजांसोबतचा काँग्रेसचा संबंध संपला : आता त्यांनी आहे तिथेच रहावे, काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड



**मुंबई :** महापालिकेतील काँग्रेसचे माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांच्या भाजप प्रवेशावर खासदार वर्षा गायकवाड यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. रवी राजा व आमचा संबंध संपला. आता त्यांनी ते जिथे आहेत, तिथेच रहावे, असे त्यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी एका टप्प्यात निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात पक्षांतराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मुंबई महापालिकेतील काँग्रेसचे माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी गुरुवारी काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपत प्रवेश केला. त्यांच्या या सोडचिठ्ठीवर काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

वर्षा गायकवाड म्हणाल्या, माझी दोनच दिवसांपूर्वी रवी राजा यांच्याशी भेट झाली. आमच्या प्रभारींनीही त्यांची भेट घेतली. त्यांची समजूत काढली. एखादे तिकीट मिळाले नाही म्हणून नाराज होणे चुकीचे आहे. सर्वांनीच पक्षाशी एकनिष्ठ राहण्याची गरज आहे. सत्ता मिळत नाही, तिकीट मिळत नाही म्हणून दुसऱ्या पक्षात जाणे योग्य नाही. आज रवी राजा यांचा जो काही चेहरा बनला, तो केवळ काँग्रेसमुळे बनला. ते पाचवेळा नगरसेवक म्हणून निवडून आले. पण आता त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला.

१९९५ साली माझ्या वडिलांनीही उमेदवारी मिळाली नव्हीत. त्यानंतर मलाही सुरुवातीच्या काळात पक्षाने उमेदवारी नाकारली. यंदाच्या लोकसभा निवडणुकीतही आम्हाला ज्या ठिकाणी तिकीट हवे होते, तिथे पक्षाने तिकीट दिले नाही. याचा अर्थ आम्ही नाराज झालो असे नाही. पण रवी राणा यांची नाराजी जगजाहीर होती. त्यांनी केवळ तिकीट मिळाले नाही म्हणून पक्ष बदलला.

वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या, रवी राजा यांना भाजपने कोणते पद दिले हे मला माहिती नाही. पण आता आमचा व त्यांचा संबंध संपला आहे. त्यांनी आता ते जिथे आहेत, तिथेच रहावे. त्यांना काँग्रेसने विरोधी पक्षनेतेपद दिले. हे पद आमदाराच्या बरोबरीचे होते. पण त्यानंतरही त्यांनी केवळ आमदारकीचे तिकीट मिळत नाही म्हणून पक्षांतर केले. त्यांच्या पक्ष सोडण्यामागे त्यांच्या मागचे काही प्रकरणेही कारणीभूत आहेत. त्यांनी हा निर्णय घेताना या प्रकरणाचाही विचार केला असेल, असेही वर्षा गायकवाड यावेळी बोलताना म्हणाल्या.

## कन्नड विधानसभेत चौरंगी किंवा पंचरंगी लढत होण्याची शक्यता

**कन्नड (अक्षय चव्हाण) :** विधानसभेसाठी माजी आमदार, आजी आमदार, महिला जिल्हाध्यक्षा, माजी जिल्हा परिषद सदस्या, जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख यासह उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहे. त्यापैकी बुधवारी झालेल्या नामनिर्देशन पत्राच्या छाननीत ७ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरविण्यात आले त्यामुळे ४३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.

यापैकी आता माघार नेमकी कोण घेणार आणि कोण प्रत्यक्षात निवडणुकीच्या रिंगणात उतरणार याकडे तालुक्यातील मतदारांचे लक्ष लागले आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी महायुतीकडुन संजना जाधव यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

महाविकास आघाडीकडून आमदार उदयसिंग राजपूत यांनी कुठलेही शक्तिप्रदर्शन न करता नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. कन्नड सोयगाव विधानसभा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी दुरंगी लढत होईल, अशी सुरुवातीला शक्यता होती.

परंतु उद्योजक मनोज पवार, माजी आमदार हर्षवर्धन जाधव, शिवसेनेचे तालुकाप्रमुख केतन काजे, माजी आमदार नितीन पाटील, माजी नगराध्यक्ष स्वाती संतोष कोल्हे, संतोष कोल्हे, मनसेचे प्रा. लखन चव्हाण, वंचितकडून आय्याज शहा, भाजपकडून डॉ. संजय गव्हाणे, आपचे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करत या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे संकेत दिले आहे. त्यामुळे सुरुवातीला महायुतीत व महाविकास आघाडीत सरळसरळ लढत होईल असे वाटत असताना तालुक्यातील अनेक दिग्गजांच्या अपक्ष उमेदवारीमुळे चौरंगी किंवा पंचरंगी लढत होणार आहे.

संजना जाधव यांना महायुतीत शिंदे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आली. महायुतीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली. अधिकृत उमेदवाराच्या विरोधात महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे माजी आमदार नामदेव पवार यांचा एकमेव अर्ज दाखल आहे. त्यामुळे ४ नोव्हेंबरला पवार उमेदवारी अर्ज मागे घेतील असा विश्वास महाविकास आघाडीतील नेत्यांना आहे.

तर महायुतीत बंडखोरांत माजी आमदार नितीन पाटील, संतोष कोल्हे, केतन काजे, संजय गव्हाणे यांच्यापैकी एक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहण्याची शक्यता आहे. हे बंड शमविण्याचे मोठे आव्हान महायुतीपुढे असणार आहे.

अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केलेले काँग्रेसचे माजी आमदार नामदेव पवार, शिंदेसेनेचे तालुकाप्रमुख केतन काजे, भाजपचे डॉ संजय गव्हाणे, राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) नितीन पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, महिला जिल्हाध्यक्ष स्वाती कोल्हे, या प्रमुख नेत्याचे उमेदवारी अर्ज आहेत. या सर्वांचा तालुक्यात प्रभाव असून यांच्याकडेही मोठा मतप्रवाह असल्याने यापैकी कोणाची उमेदवारी कायम राहते याकडेही जनतेचे लक्ष लागून आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002


## मनोज जरांगेंचे आंदोलन सामाजिक त्याला राजकारणाशी जोडू नये : चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई :** मनोज जरांगे यांचे आंदोलन हे सामाजिक आहे त्याला राजकारणाशी जोडू नये. आमचे सरकार मराठा, ओबीसी समाजाला न्याय देत आहे, त्यांच्या आंदोलनावर मी बोलणे काही योग्य नाही असे वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हंटले आहे.

दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, राज्यभरात ज्यांनी अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केले आहे ते अर्ज मागे घ्यावे अश्या सूचना पक्षाने दिल्या आहेत. शेवटी एका मतदारसंघातून एकच जण निवडणूक लढू शकतो त्यामुळे पक्षावर श्रद्धा ठेवावी आणि अर्ज मागे घ्यावे असे आम्ही सांगितले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ज्या लोकांनी पक्ष सूचनेचे पालन केले तर त्यांच्यावर कारवाई होणार नाही, पण जे घेणार नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असेही बावनकुळे यांनी म्हंटले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की माहीम मतदारसंघात शिवसेना उमेदवार सदा सरवणकर माघार घेतील का नाही याबद्दल आपल्याला काही माहिती नाही.तो शिवसेनेचा अंतर्गत प्रश्न आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की,राज ठाकरे हे आपल्या शैलीने बोलत असतात त्यांनी कुणाला टोला लगावला हे मला माहिती नाही. त्यांनी आपली भूमिका मांडली आहे, त्यांची आणि आमची भूमिका स्पष्ट आहे, ते आमच्यासोबत आहेत. राज ठाकरे हे राज्याच्या विकासासाठी मदत करतील असे बावनकुळे यांनी म्हंटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अनिल देशमुख यांनी जुन्या आठवणीत न राहता निवडणूक लढवण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे, तुमचे टोमणे बंद करा आणि मविआचा जाहीरनामा आम्हाला सांगा... विकासकामाबद्दल काही तरी बोलवे असेही त्यांनी यावेळी म्हणत मविआला टोला लगावला आहे...


